# मुंबई विद्यापीठ

तातडीचे / हस्ते बटवडा
स्मरण पत्र – १
प्र.वि./आयसीडी/२०१३–१४/७६
कक्ष क्र. २२१,
मुंबई – ४०० ०३२.
दिनांक : ७ ऑक्टोबर २०१३.

**विषय : विद्यापीठाचे २०१२–१३ चे वर्षवृत्त १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३ या कालावधीतील माहितीचे संकलन.**

महोदय/महोदया,

या कार्यालयाच्या उपरोक्त विषयावरील दिनांक ९/०४/२०१३च्या परिपत्रकानुसार पत्र क्र.प्र.वि./आयसीसी/२०१३–१४/१च्या अनुषंगाने आपणास कळवू इच्छितो की, वरील परिपत्रकाद्वारे मागविलेली माहिती आपण अद्याप पाठविलेली नाही.

आपल्याकडून आवश्यक असलेला विभागाचा अहवाल **महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, पत्र क्रमांक विवाअ २०१०(२१५/१०)/विशी–३, दिनांक २५ ऑगस्ट २०१०** प्रमाणे मराठीचे इंग्रजी व इंग्रजीचे मराठी मध्ये भाषांतरीत करून दयावयाचे आहे. तरी आपणांस विनंती करण्यात येते की, सदर माहिती **दिनांक ३० ऑक्टोबर २०१३** पर्यंत **प्रकाशन विभाग, कक्ष क्र. २२१, मुंबई विद्यापीठ, फोर्ट** परिसर येथे पाठविणे आवश्यक आहे.

**०१ नोव्हेंबर २०१३** नंतर कोणत्याही माहितीचा वर्षवृत्तामध्ये समावेश केला जाणार नाही व सदर माहिती पाठविण्यास आपण उत्सुक नाही असे समजण्यात येईल व त्याची सर्व जबाबदारी विद्यापीठ विभाग/प्राचार्य व संस्था संचालक संबंधितांवर राहिल. याबाबत काळजीपूर्वक नोंद घेण्यात यावी.

हे पत्र अत्यंत तातडीचे समजावे.

टिप :– १) वर्षवृत्त माहितीबाबतचे परिपत्रक **www.mu.ac.in** या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२) वर्षवृत्ताची माहिती महाविद्यालय/विद्यापीठ विभागांचे संचालक व विभाग प्रमुख/मान्यता प्राप्त संस्थाचे प्रमुख यांनी या अगोदर पाठविली असल्यास हे स्मरणपत्र विचारात घेऊ नये.
३) वर्षवृत्ताची माहिती खालील नियमाप्रमाणे असावी.
   १) माहिती १००० शब्दात महाविद्यालयातील घटनांविषयी असावी तसेच माहिती बुलेट पॉईटस् मध्ये द्यावी.
   २) हाती लिहीलेली माहिती स्वीकारली जाणार नाही.
   ३) हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी मराठी व इंग्रजी मध्ये देण्यात यावी.
   ४) मराठीसाठी फॉन्ट कृतीदेव ५०, साईझ १६ व इंग्रजी Times New Roman, साईझ १४ मध्ये देण्यात यावी.

आपला विश्वासू,
07/10/13

उपकुलसचिव, (जनसंपर्क)